## निवडक

### केरी - सत्तरी येथे उद्या स्वामी आर्यानंद यांचे व्याख्यान

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २८ :** केरी – सत्तरी येथील विवेकानंद स्मृती संघ संचालित विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे गुरुवार दि. ३० रोजी संध्याकाळी ५ वाजता विद्यालयात रामकृष्ण मिशन गोवाचे प्रमुख स्वामी आर्यानंद यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले असून ते विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसोबत, पालक व ग्रामस्थांसाठीही खुले आहे. यावेळी ते विद्यार्थी व पालकांसोबत संवाद साधणार आहेत.यावेळी रामकृष्ण मिशनचे फिरते ग्रंथप्रदर्शन असणार असून स्वामी विवेकानंदांवर आधारित अनेक पुस्तके उपलब्ध असणार आहेत. अत्यल्प कमी किमतीत ती उपलब्ध होणार असून यावेळी ती खरेदी करता येणार आहेत. या कार्यक्रमाला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नामदेव गावस, सामाजिक कार्यकर्ते विश्वेश पोरोब, शिक्षण संस्थेचे इतर पदाधिकारी, मुख्याध्यापक गोपीनाथ गावस उपस्थित राहणार आहेत. स्वामी आर्यानंद हे रामकृष्ण मिशन फोंडाचे प्रमुख आहेत. स्वामी आर्यानंदजी महाराजांनी १९९० मध्ये रामकृष्ण संघाच्या पुणे शाखेत प्रवेश घेतला. तेथील आश्रमाच्या 'स्वामी विवेकानंद बालक सेवा संघ' च्या माध्यमातून त्यांनी शेजारच्या वस्तीत राहणाऱ्या बऱ्याच मुलांच्या जीवनात आमूलाग्र बदल केला व व त्यांना उच्च जीवनासाठी तयार केले. १९९५ ते १९९७ या काळात रामकृष्ण मठाच्या मुख्यालयात म्हणजे बेलूर मठात ते प्रशिक्षणासाठी गेले.

१९९७ ते २००७ या काळात त्यांनी गुजरातमधील रामकृष्ण मिशन विवेकानंद स्मारक पोरबंदर येथे सेवा दिली. या कार्यकाळात त्यांनी मठाद्वारे दुष्काळ, चक्रीवादळ आणि २००१च्या भूकंपाच्या सेवाकार्यात सक्रिय सहभाग घेतला. २००७ मध्ये त्यांची बदली पुणे येथे झाली. येथे त्यांनी पुन्हा बालक–संघाचे काम हाती घेतले व त्याला बळकट केले व युवक संघाच्या माध्यमातून अनेक तरुणांच्या चारित्र्य गठणाचे कार्य केले व त्यांच्या जीवनाला योग्य दिशा दाखविली. शाळा, महाविद्यालये, शिक्षक व पोलिस प्रशिक्षण केंद्रे इत्यादी ठिकाणी होणाऱ्या व्यक्तिमत्त्व विकास विषयांवरील प्रबोधनासाठी ते एक लोकप्रसिद्ध वक्ते आहेत. त्यांनी तुरूंगातही अनेक व्याख्याने दिली आहेत.

---

### मदनंत क्रिकेट क्लबची सर्वसाधारण १ फेब्रुवारीला बैठक

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २८ :** सावईवेरे येथील मदनंत क्रिकेट क्लबची सर्वसाधारण बैठक येत्या शनिवारी १ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७.३० वाजता क्लबच्या सभागृहात बोलाविण्यात आली आहे. या बैठकीत क्लबच्या वर्धापनदिन कार्यक्रमासंबंधी चर्चा करण्यात येणार असून या बैठकीला सर्व सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन क्लबचे अध्यक्ष बाबुराव शेट्ये यांनी केले आहे.

---

### देऊळवाडा सूर्ला ट्रान्सफॉर्मरवर आज वीजपुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २८ :** बुधवार दि. २९ रोजी देऊळवाडा सूर्ला वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी १ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने देऊळवाडा सूर्ला परिसरात वीजपुरवठा असणार नाही.यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# इंग्लंडचा भारतावर शानदार विजय

## मालिकेतील आव्हान कायम : भारतीय फलंदाजांनी केली सपशेल निराशा



**राजकोट, दि. २८ :**

येथे खेळविण्यात आलेल्या तिसऱ्या टी– ट्वेंटी सामन्यात इंग्लंडने अखेर भारतावर दमदार विजय साकारला. भारतीय संघ विजयासाठी १७२ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला खरा, पण त्यांना एकामागून धक्के बसले. त्यामुळे भारतीय संघ अडचणीत आला होता. यावेळी हार्दिक पंड्यावर सर्वांच्या नजरा खिळलेल्या होत्या, पण तो ४० धावांवर बाद झाला आणि सामना इंग्लंडच्या बाजूने फिरला. इंग्लंडने या सामन्यात भारतावर २६ धावांनी विजय साकारत आपले मालिकेतील आव्हान जीवंत ठेवले आहे. पण या सामन्यानंतरही भारताकडे २–१ अशी आघाडी कायम आहे. मोहम्मद शमीच्या कमबॅकच्या सामन्यात वरुण चक्रवर्तीची चमक पाहायला मिळाली. वरुणने यावेळी पाच विकेट्स मिळवल्या, त्यामुळेच भारताला इंग्लंडला १७१ धावांत रोखता आले.

इंग्लंडकडून मिळालेल्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताला संजू सॅमसनच्या रुपात जोफ्रा आर्चरने पहिला धक्का दिला, त्याला तीन धावाच करता आल्या. त्यानंतर अभिषेक शर्माने धडाकेबाज फटकेबाजी केली. त्यामुळे भारताची धावगती वाढायला लागली. पण यावेळी अभिषेकला मोठी खेळी साकारता आली नाही. कारण जोफ्रा आर्चरने त्याचा अप्रतिम झेल पकडला. अभिषेकने यावेळी १४ चेंडूंत पाच चौकारांच्या जोरावर २४ धावा केल्या. सूर्यकुमार यादव या सामन्यात तरी तळपेल, असे वाटत होते. पण त्याला १४ धावांवर समाधान मानावे लागले, गेल्या सामन्यातील मॅचविनर तिलक वर्मा यावेळी १८धावाच करू शकला. त्यामुळे भारताची ४ बाद ६८ अशी अवस्था झाली होती. पण त्यावेळी हार्दिक पांड्यावर सर्वांच्या आशा टिकून होत्या. पण हार्दिक पांड्या ४० धावांवर बाद झाला आणि भारताच्या हातून सामना निसटला.

तत्पूर्वी, सूर्याने टॉस जिंकत प्रथम गोलंदाजी स्विकारली. त्यावेळी मोहम्मद शमीवर सर्वांचे लक्ष होते, पण शमीला या सामन्यात एकही विकेट मिळवता आली नाही. कारण यावेळी गोलंदाजीची जादू दाखवली ती वरुण चक्रवर्तीने. वरुण चक्रवर्तीने यावेळी पाच विकेट्स मिळवत इंग्लंडला एकामागून एक धक्के दिले इंग्लंडचा कर्णधार जोस बटलर पुन्हा या सामन्यात अर्धशतक झळकावेल, असे वाटत होते. पण त्याला २४ धावांवर असताना वरुण चक्रवर्तीनेने बाद केले आणि इंग्लंडला मोठा धक्का दिला.

### बटलरने रचला इतिहास

**जोस बटलरने आजच्या टी–२० सामन्यात १८ धावा पूर्ण करताच त्याने एक मोठा विक्रम रचला. बटलर अवघ्या २४ धावा करत बाद झाला पण त्याने विक्रम मात्र त्याने आपल्या नावे केला आहे. बटलर हा भारतीय भूमीवर सर्वाधिक टी–२० आंतरराष्ट्रीय धावा करणारा फलंदाज ठरला आहे. त्याने अफगाणिस्तानच्या मोहम्मद नबीला मागे टाकले, ज्याने २५ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५५६ धावा केल्या. आता जोस बटलर हा टी–२० मध्ये भारतात सर्वाधिक धावा करणारा विदेशी फलंदाज बनला आहे. त्याने २०व्या टी–२० सामन्यात ५५७* धावा केल्या आहेत. या प्रकरणात, दक्षिण आफ्रिकेचा क्विंटन डी कॉक तिसऱ्या स्थानावर आहे, ज्याने १२ टी–२० सामन्यांमध्ये ४५८ धावा केल्या आहेत. ग्लेन मॅक्सवेल ४४५ धावांसह चौथ्या आणि मोहम्मद शेहजाद ४३५ धावांसह पाचव्या स्थानावर आहे.**

### वरूण चक्रवर्तीचा नवा विक्रम

**भारताचा मिस्ट्री स्पिनर वरूण चक्रवर्तीने ५ विकेट्स घेतले आहेत. ५ विकेट्स घेत वरूणने इतिहास घडवत नवा विक्रम आपल्या नावे केला आहे. वरूणने आपल्या जादुई गोलंदाजीच्या जोरावर इंग्लंडला गुडघे टेकण्यास भाग पाडले. वरूणने ४ षटकांच्या स्पेलमध्ये २४ धावा देत ५ विकेट्स घेतले आहेत. त्याने भेदक गोलंदाजी करत विकेट तर घेतलेच पण धावाही दिल्या नाहीत. टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाच विकेट घेण्याची ही त्याची दुसरी वेळ आहे. पहिल्यांदा त्याने दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या टी–२० सामन्यात भारतासाठी पहिल्यांदा पाच विकेट्स घेतले होते. भारतासाठी टी–२० क्रिकेटमध्ये दोन वेळा पाच विकेट्स घेणारा तो तिसरा भारतीय ठरला आहे. त्याच्या आधी, कुलदीप यादव आणि भुवनेश्वर कुमार यांनी टी–२० क्रिकेटमध्ये प्रत्येकी दोन वेळा पाच विकेट्स घेतल्या आहेत.**



# जी. त्रिशा टी २० विश्वचषकात शतक झळकावणारी पहिली फलंदाज

**मलेशीया, दि. २८ :**

भारताची जी. त्रिशा अंडर–१९ महिला टी२० विश्वचषकात शतक झळकावणारी पहिली फलंदाज ठरली आहे. तिने मंगळवारी स्कॉटलंडविरुद्धच्या सुपर–६ सामन्यात ५९ चेंडूत ११० धावांची खेळी खेळली आणि नाबाद राहिली. एवढेच नाही तर तिने ३ विकेट्सही घेतल्या.

त्रिशाच्या दुहेरी कामगिरीच्या जोरावर भारताने हा सामना १५० धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. जी त्रिशाला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. संघाने आधीच उपांत्य फेरी गाठली आहे.

अंडर–१९ महिला टी–२० विश्वचषक स्पर्धेचा हा दुसरा हंगाम आहे. पहिला सीझन २०२३ मध्ये झाला, ज्यामध्ये एकाही खेळाडूला शतक करता आले नाही. या मोसमातील पहिले शतक भारतीय फलंदाजाच्या बॅटने झळकले आहे.

मागील विश्वचषक भारतानेच जिंकला होता. त्रिशाही त्या संघात होती. त्यानंतर तिच्या वडिलांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, त्यांना त्यांच्या मुलीच्या प्रशिक्षणासाठी त्यांची जिम आणि ४ एकर जमीन विकावी लागली. मलेशियातील क्वालालंपूरमध्ये स्कॉटलंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने २० षटकांत १ गडी गमावून २०८ धावा केल्या. प्रत्युत्तरात स्कॉटलंडचा संघ ५८ धावांत सर्वबाद झाला. भारतीय संघासाठी जी त्रिशाने ५९ चेंडूत ११० धावांची खेळी केली. तिने १३ चौकार आणि ४ षटकार मारले. तिने ५३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले होते.

त्यांची सलामीची जोडीदार कमलिनी जीने ४२ चेंडूत ५१ धावांची खेळी खेळली. दोघांनी मिळून १४७ धावांची भागीदारी केली. कमलिनी बाद झाल्यानंतर उपकर्णधार सानिका चाळकेने २० चेंडूत ५ चौकारांच्या मदतीने २९ धावा केल्या.

जी त्रिशा २०२३ मध्ये पहिला अंडर–१९ महिला टी २० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा एक भाग आहे. भारतीय संघाने अंतिम सामन्यात इंग्लंडचा ७ विकेट राखून पराभव करत विजेतेपद पटकावले. त्रिशाने अंतिम सामन्यात २९ चेंडूत २४ धावांची खेळी केली होती.

२०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या स्कॉटलंडची फलंदाजी खराब झाली. संघाच्या एकाही फलंदाजाला १५ पेक्षा जास्त धावा करता आल्या नाहीत. भारताकडून आयुषी शुक्लाने ४ बळी घेतले. तर वैष्णवी शर्मा आणि जी त्रिशा यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले.

**भारतीय संघ :** निक्की प्रसाद (कर्णधार), सानिका चाळके (उपकर्णधार), जी त्रिशा, कमलिनी जी (यष्टीरक्षक), भाविका अहिरे (यष्टीरक्षक), ईश्वरी अवसरे, मिथिला विनोद, जोशिता व्हीजे, सोनम यादव, पारुनिका सिसोदिया, केसरी धृती, आयुषी शुक्ला आनंदिता किशोर, एमडी शबनम, वैष्णवी एस. स्टँडबाय: नंदना एस, इरा जे, अनाडी टी.





28 YEARS Hyundai India | Trust of over 1.1 Mn+ CRETA owners and counting | Driving range up to 473 km per full charge** | 0 to 100 km/h in 7.9s^ | 51.4 kWh battery pack | Over 10 000 EV charging points mapped on myHyundai app | 8 Years / 1 60 000 km battery warranty^^

Hyundai's global EV technology | All-weather electric SUV | Fast DC charging: 10% to 80% in 58 min (50 kW)*** | V2L: Power your appliances inside and outside# | Smart connected 11 kW home charger | In-car Payment | Hyundai Bluelink (70+ connected car features)

Scan to visit https://cretaelectric.hyundai.co.in/

HYUNDAI

Scan to chat with us or give a missed call at 9555295868 | my Hyundai app | Hyundai Cl!ck to Buy | 3 YEAR Unlimited Kilometer Warranty | UPTO 7 YEARS Extended Warranty~ | UPTO 5 YEARS Shield of Trust Service Packages~ | Bluelink 3 Years free Bluelink subscription with 70+ Bluelink features

**For Information Contact:** Toll Free: 1800114645 **Porvorim:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Margao:** Alcon Hyundai, Ph: 7030938989 **Verna:** Goa Hyundai, Ph: 6699999, 9822131489 **Tivim:** Goa Hyundai, Ph: 8390965558 **Ponda:** Goa Hyundai, Ph: 2313375, 9822588861

*Ex-showroom price for Executive trim (42 kWh battery pack). Terms & conditions apply. Features and specifications shown in pictures may not be part of standard fitment and the same may vary from variant to variant. To know more, visit https://cretaelectric.hyundai.co.in/. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour and equipment at any time without prior notice. **Range as per AIS 040 (Rev.1) (km) ARAI certification under controlled conditions for 51.4 kWh new battery pack. ^Basis HMIL internal testing under controlled conditions for 51.4 kWh new battery pack. ***10%-80% in 58 minutes using 50 kW DC Charging. Charging time is dependent upon multiple factors including charger specification, ambient temperature, uninterrupted power supply, etc. #For V2L outside, the gun would be available as an accessory on payable basis. For creative representation purpose only. The black shades on glass is due to lighting effect. Bluelink functionality is dependent on adequate power supply and uninterrupted network connectivity. ^^Battery warranty up to 8 years or 1 60 000 km whichever occurs earlier. ~For detailed terms & conditions of Extended warranty, Road Side Assistance & Shield of Trust/Shield of Trust Super, kindly visit Hyundai India website. https://www.hyundai.com.

INNOCEAN-003/25


RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४७ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 147 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .